# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## विभाग : अग्निशमन विभाग

Scanned with OKEN Scanner

# जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव
## अग्निशमन व आपत्कालीन विभाग

जा.क्र./फायर/ 22/२०२६-२७
दिनांक : 16/०४/२०२६

प्रति,
कार्यालय अधिक्षक,
प्रमुख कार्यालय,
म.न.पा.जळगाव

**विषय :-** जळगाव शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत घेण्यात आलेले निर्णय, मंजूर कामे, आर्थिक व्यवहार व प्रशासकीय कारभाराबाबत सविस्तर श्वेत प्रत्रिका (White Paper) प्रसिद्ध करण्याबाबत.

**संदर्भ :-** मा.आयुक्त सो. यांचे कडील कार्यालयीन आदेश जा.क्र./जमपा/प्रमुख का./४२७०/२०२६ दि.३०/०३/२०२६

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय आदेशान्वये प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत श्वेत पत्रिका काढणे बाबत इकडील कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने अग्निशमन सेवा अत्यावश्यक सेव लक्षात घेता नागरिकांना आपत्तीकाळात तात्काळ मदत व प्रतिसाद देणे करीता अग्निशमन सेवेत पुरेसा प्रशिक्षीत मणुष्यबळ असणे आवश्यक आहे.

तरी कर्मचारी कमतरता लक्षात घेता वाढत्या कामकाजामुळे कंत्राट पद्धतीने अग्निशमन विभागात मनुष्यबळ पुरवठा करणे करीता खालील प्रमाणे कंत्राट दि. ०१/११/२०२५ पासून देण्यात आलेले आहे.

**कामाचे नांव :-** जळगाव शहर महानगरपालिका अंतर्गत अग्निशमन विभागाकरीता वाहन चालक-यंत्रचालक (Driver - Operator) व अग्निशमन विमोचक (Fireman) असे पदे बाह्य यंत्रणेद्वारे (एजन्सी / ठेकेदार मार्फत) वेळोवेळी आवश्यकतेनुसार पुरविणे बाबत...

**कंत्राटदार/पुरवठादाराचे नांव :-** रेऑन प्रोटेक्शन प्रा.लि. जळगाव

| अ.क्र. | कंत्राटी कर्मचारी (पदनिहाय) | कर्मचारी संख्या | महासभा / प्रशासक ठराव | स्थायी समिती / प्रशासक ठराव | कार्यादेश |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाहन चालक - यंत्र चालक | १७ | क्र. २३१ दि. १३/०२/२०२५ | क्र.३१४ दि. १०/१०/२०२५ | क्र.०२ दि. १६/१०/२०२५ |
| २ | अग्निशमन विमोचक | ३८ | | | |

**सोबत :-**

१) महासभा / प्रशासक ठराव
२) स्थायी समिती / प्रशासक ठराव
३) कार्यादेश

(अश्वजीत घरडे)
**प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी**

Received
Patil
17.04.2026

O/C

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax-2222260


सभा क्र.३२

(महासभा)

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र :-२३१** **दिनांक :-१३/०२/२०२५**

वाचा :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांचेकडिल जा.क्र./फायर डॉकेट/४४४/२०२४-२५ दि.२२/०१/२०२५
३. सहायक आयुक्त यांचा दि.१३/०१/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.१४/०१/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१६/०१/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१६/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** वाहन चालक-यंत्रचालक (Driver-Operator) १४ व अग्निशमन विमोचक (Fireman) ८८ असे एकूण १०२ पदे बाह्य यंत्रणेव्दारे (एजन्सी / ठेकेदार मार्फत) भरणेस मान्यता मिळणे बाबत.

वाचा क्र.१ व अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

शासन निर्णय क्र.जमपा-२०२०/प्र.क्र.१८४/नवि-२५ दि.१६ फेब्रुवारी २०२३ नुसार जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव च्या आस्थापनावर नविन पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. संचालक अग्निशमन सेवा मुंबई यांचे कडील शिफारशीनुसार जळगांव शहराकरीता अग्निशमन केंद्रे, अग्निशमन वाहने, व त्यावरील मनुष्यबळ किती असायला पाहिजे त्याबाबत शिफारस प्राप्त झालेली आहे. सदयास्थित शहरात ०३ अग्निशमन केंद्रे, अग्निशमन वाहने ०५, अधिकारी/कर्मचारी (कायम) ३२, कंत्राटी फायरमन १२ व ०१ मुख्यमंत्री कार्यकुशल योजना असे एकुण ४५ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

आयुक्त यांचे दि.१०/०१/२०२५ रोजीच्या बैठकीत दिलेल्या आदेशान्वये अग्निशमन विभागाकडील उपलब्ध अग्निशमन केंद्र व अग्निशमन वाहने तसेच नव्याने दाखल होणारे अग्निशमन वाहने याकरीता आवश्यक प्रशिक्षित कर्मचारी बाह्य यंत्रणेव्दारे (एजन्सी / ठेकेदार मार्फत) भरणेत यावे असे निर्देश दिलेले आहेत.

शासन निर्णय क्रमांक: जमपा -२०२४/प्र.क्र.०१/नवि-२५ दि.१४ ऑक्टोंबर, २०२४ नुसार जळगांव महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२४ मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार अग्निशमन विभागाला आवश्यक वाहन चालक-यंत्रचालक व अग्निशमन-विनोचक (फायरमन) संख्या व शैक्षणीक व तांत्रिक अर्हता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | आवश्यक असलेले कर्मचारी पदनाम | आवश्यक कर्मचारी संख्या | शैक्षणीक व तांत्रिक अर्हता (सेवा प्रवेश नियमानुसार) |
|---|---|---|---|
| १. | वाहन चालक-यंत्रचालक (Driver-Operator) | १४ | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण<br>ब) राष्ट्रीय / राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम असणे आवश्यक<br>क) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक<br>ड) जड वाहन चालक म्हणुन ३ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक<br>इ) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |



Scanned with OKEN Scanner

मध्ये (Price Band) किंमती न आल्याने आयुक्त यांचे दि. २८/०८/२०२५ रोजीच्या मान्यतेने तिसऱ्यांदा फेर ई निविदा सुचना क्र. ४/२०२५-२६ दि. ०२/०९/२०२५ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. सदर निविदेत एक निविदा धारकाने सहभाग नोंदविलेला आहे.

त्या अनुषंगाने उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४ /प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि. १ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाच्या नियम क्र. ४.४.३.१ मधील (क) एकही नाही अथवा एकच निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरल्यास पुर्ननिविदा काढण्यात यावी.

रुपये दहा (१०) लाखपेक्षा कमी रकमेचे निविदा असल्यास फक्त एकदाच मुदतवाढ देण्यात यावी.

कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्या नंतर देखिल) ३ निविदा पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमूद करेल. अशा प्रसंगी, किंमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल असे नमूद आहे.

अग्निशमन विभागाचे कामाचे स्वरुप विचारात घेता शहरातील नागरिकांना अग्निशमन हि अत्यावश्यक सेवा तात्काळ व प्रभावीपणे देण्यात अल्प मनुष्यबळ अभावी अग्निशमन कार्यात विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे उपरोक्त शासन निर्णयाच्या तरतूदी नुसार निविदा समितीने प्राप्त एक निविदाधारकाचा तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा उघडण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. यानुसार Rayon Protection Pvt. Ltd. यांचे प्रतिदिन् प्रति कुशल कामगार रु. १.० (एक रुपया) सेवा शुल्क प्रति कुशल कामगार प्रतिदिन या प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

मा.कामगार आयुक्त, मुंबई यांचे दि.०६/०८/२०२४ च्या परीपत्रकानुसार अभिकर्त्यामार्फत कामगारांना देय असलेले किमान वेतन दर रु. ८६९/- असून या व्यतिरिक्त कामगार कायद्यातील तरतुदीनुसार ३४.६१% लेव्हीची रक्कम खालील प्रमाणे देणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | विवरण | कामगार संख्या | टक्केवारी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मुळवेतन | - | - | ५३८ |
| २ | विशेष भत्ता | - | - | ३३१ |
| | **एकुण = मुळ वेतन + विशेष भत्ता** | **१ कामगार** | | **८६९** |
| | **GST १८% (प्रती कुशल कामगार)** | | | **१५६** |
| १ | भविष्य निर्वाह निधी | १ कामगार | १२.३६ % | १०७ |
| २ | ई.एस.आय.सी. | १ कामगार | ३.२५ % | २८ |
| ३ | बोनस | १ कामगार | ८.३३ % | ७२ |
| ४ | ग्रॅज्युईटी | १ कामगार | ४.०० % | ३५ |
| ५ | किरकोळ रजा | १ कामगार | १.०० % | ९ |
| ६ | गणवेश / पावसाळी साहित्य वाटप करणे | १ कामगार | ४.०० % | ३५ |
| ७ | Workmen compention Insurance | १ कामगार | १.६७ % | १५ |
| ८ | Rayon Protection Pvt. Ltd. यांचे प्रतिदिन प्रतिकुशल कामगार सेवा शुल्क | १ कामगार | | १ |
| | **एकुण** | | | **१३२७** |

JALGAON CITY M...

३५ अग्निशमन विमोचक (फायरमन) व १० वाहन चालक यंत्र चालक (ड्रायव्हर ऑपरेटर) एकूण ४५ कुशल कामगार अभिकर्त्याला अदा करण्यात येणारी रक्कम खालील प्रमाणे आहे.

४५ कुशल कामगारांसाठी प्रति दिवस = रु. ५९,७१५/-
प्रति महीना (२६ दिवस) = रु. १५,५२,५९०/-
१२ महीने करीता = रु. १,८६,३१,०८०/-

| प्रति दिवस | प्रति महीना (२६ दिवस) | १२ महीने करीता |
|---|---|---|
| रु. ५९,७१५/- | रु. १५,५२,५९०/- | रु. १,८६,३१,०८०/- |

४५ कुशल कामगारांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षा करीता वरील अंदाजपत्रकीय खर्च अपेक्षित असुन निविदेतील अटी-शर्ती नुसार शासनाच्या किमान वेतन अधिनियम १९४८ प्रमाणे कामगारांचे किमान वेतन दरास वेळोवेळी होणारे बदल L1 निविदाधारक यांना अनुज्ञेय असून त्या अनुषंगाने येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळावी.

भाग एक महसुली खर्च सामान्य प्रशासन यामधील मानधन लेखाशिर्षकांतर्गत सन २०२५-२६ आर्थिक बजेट मध्ये कर्मचारी मानधन या लेखाशिर्षा खाली २.५ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केलेली असून L1 निविदा धारकांचे आलेले दर व किमान वेतन अधिनियम १९४८ तरतूदी नुसार अपेक्षित खर्च सदर लेखाशिर्षातून करण्यात यावा.

तरी निवीदा धारकांचे दर स्विकृत करणे, करारनामा करणे व सदर कंत्राटदारांना कार्यादेश देण्यास मान्यता मिळण्यासाठी अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

(ज्ञानेश्वर ढेरे)
प्रशासक
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

JALGAON CITY MUNICIPAL CORPORATION JALGAON
जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

Scanned with OKEN Scanner

# जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

सरदार वल्लभभाई पटेल टॉवर, प्रशासकीय इमारत

महात्मा गांधी रोड, नेहरु चौक, जळगाव - ४२५ ००१ फोन (०२५७) २२२२२६१ ते ६५ email : jcmcjalgaon@gmail.com

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Sardar Vallabhbhai Patel Tower, Administrative Building

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon - 425001 Ph (0257) 2222261 to 65 email : jcmcjalgaon@gmail.com


बेटी बचाओ
Save the girl child
मुलगी वाचवा देश वाचवा

संदर्भ क्र. /ज.श.म.न.पा./फायर/कार्यादेश/०२/२०२५-२६ दिनांक : १६/१०/२०२५

## कार्यादेश

(शिक्का: जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव — अग्निशमन / आणीबाणी सेवा)

प्रति,

**Rayon Protection Pvt.Ltd.**

**मक्तेदार, जळगाव.**

**विषय :-** जळगाव शहर महानगरपालिका अंतर्गत अग्निशमन विभागाकरीता वाहन चालक-यंत्रचालक ( Driver - Operator ) १० व अग्निशमन विमोचक ( Fireman ) ३५ असे एकूण ४५ पदे बाह्य यंत्रणेद्वारे (एजन्सी/ठेकेदार मार्फत) वेळोवेळी आवश्यकतेनुसार पुरविणे बाबत...

**संदर्भ :-** १. मा. महासभा / प्रशासक ठराव क्र.२३१ दि. १३/०२/२०२५

२. ई-निविदा सुचना क्र.०४/२०२५-२६ दि. ०२/०९/२०२५

३. आपण दिनांक ११/०९/२०२५ रोजी सादर केलेली ई-निविदा सुचना क्र.०४

४. मा.स्थायी समिती / प्रशासक ठराव क्र.३१४ दि. १०/१०/२०२५

५. इकडील कार्यालयाकडील पत्र जा.क्र./फायर/२५५/२०२५-२६ दि. १४/१०/२०२५

६. आपण करुन दिलेला दि. १६/१०/२०२५ रोजीचा करारमाना.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये संदर्भ क्र.३ नुसार १ वर्षाकरीता जळगाव शहर महानगरपालिका अंतर्गत अग्निशमन विभागाकरीता वाहन चालक-यंत्रचालक (Driver-Operator) १० व अग्निशमन विमोचक (Fireman) ३५ असे एकूण ४५ पदे बाह्य यंत्रणेद्वारे (एजन्सी / ठेकेदार मार्फत) वेळोवेळी आवश्यकतेनुसार पुरविणे कामी आपण दिनांक ११/०९/२०२५ रोजी सादर केलेली ई-निविदा सुचना क्र.०४.

त्या अनुषंगाने मा.स्थायी समिती / प्रशासक ठराव क्र.३१४ दि. १०/१०/२०२५ अन्वये उपरोक्त कामाकरीता किमान वेतन अधिनियमानुसार मुळ वेतन + विशेष भत्ता ८६९ (प्रतिदिन कुशल कामगार) यावर प्रति कुशल कामगार प्रतिदिन सर्विस चार्ज रु. १/- (एक रुपया) तसेच कामगार कायद्यातील तरतूदी नुसार ३४.६१% लेव्ही या प्रमाणे ८ तासांकरीता सर्व कर समाविष्ट करुन प्रतिदिन प्रतिकुशल कामगार रु. १३२७/- याप्रमाणे ४५ कुशल कामगारांसाठी प्रति दिवस रु. ५९,७१५/-, प्रति महिने करीता (२६ दिवस) रु. १५,५२,५९०/-, १२ महिने करीता रु. १,८६,३१,०८०/- मात्रचा खर्चास मंजुरी देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र. ६ नुसार करारनाम्यातील परिशिष्ठ अ मधील अटी व शर्ती च्या अधिन राहून कार्यादेशाच्या दिनांकापासून १ वर्षाकरीता जळगाव शहर महानगरपालिका अंतर्गत अग्निशमन विभागाकरीता वाहन चालक-यंत्रचालक (Driver-Operator) १० व

[illegible]

[illegible]

[illegible]

उपायुक्त ( [illegible] )

[illegible] शहर महानगरपालिका, [illegible]

प्रत कार्यवाहीसाठी :

१) अग्निशमन अधिकारी, [illegible]

## जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

जा.क्र./जमपा/प्रमुख का./६२४०/२०२६
दिनांक : 30/०३/२०२६

### कार्यालयीन आदेश

**विषय :-** जळगांव महानगरपालिकेत प्रशासकिय राजवटीच्या कालावधीत घेण्यात आलेले निर्णय, मंजूर कामे, आर्थिक व्यवहार व प्रशासकिय कारभाराबाबत सविस्तर श्वेत पत्रिका (White Pepaer) प्रसिध्द करण्याबाबत.

**संदर्भ :-** १) सन्मा. नगरसेविका सौ. वैशाली अमित पाटील, यांचा दिनांक ०४/०३/२०२६ चा अर्ज या कार्यालयात प्राप्त दिनांक २७/०३/२०२६

२) सन्मा. नगरसेविका सौ. वैशाली अमित पाटील, यांचा दिनांक २३/०३/२०२६ चे स्मरणपत्र या कार्यालयात प्राप्त दिनांक २७/०३/२०२६

उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने, सर्व संबंधित विभाग प्रमुखांना कळविण्यात येते की, जळगांव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ नुकतीच पार पडली आहे. त्या निवडणूकीत निवडून आलेल्या, नवनिर्वाचित सन्माननीय सदस्या सौ. वैशाली अमित पाटील यांनी संदर्भीय पत्र क्र. ०१ अन्वये पत्र दिलेले आहे. सदर पत्रात प्रशासकिय राजवटीच्या संपूर्ण कालावधीतील कामकाजाविषयीची माहिती, अधिकृत श्र्वेतपत्रिका, अहवाल तयार करून म. न. पा. च्या संकेतस्थळावर, सार्वजनिक माध्यमांतुन प्रसिध्द करून, जनतेला अवगत करून देण्याविषयी कळविले आहे. **सदर पत्राची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.**

सदर पत्राचे सविस्तर, सखोल अवलोकन करून, विशेषतः पत्रातील पॅरा. क्र. ०१ ते ०४ चे सुक्ष्म अवलोकन करून, संपूर्ण कार्यालयातील सविस्तर इत्यंभूत, श्वेतपत्रिकेच्या तयारी निशी माहिती तयार करून A४ साईजमध्ये तसेच सॉप्ट कॉपीमध्ये ISM-V ६ मध्ये DVOT-YogeshMR या १० च्या फॉन्डमध्ये **एप्रिल २०२६** चे दुसऱ्या आठवडयाच्या अखेर तयार करून प्रमुख कार्यालयात पाठविण्यात यावी. सदर माहितीमध्ये त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदर कामी उद्भवणाऱ्या कोणत्याही प्रश्नांच्या सोडवणूकीत अडचण येणार नाही याची योग्य तयारी ठेवावी. सदरची मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास व माहिती देण्यास विलंब झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(ज्ञानेश्वर ढेरे),
आयुक्त,
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**प्रति,**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुख्य लेखाधिकारी | १३. | अतिक्रमण निर्मुलन अधिक्षक |
| २. | मुख्य लेखापरिक्षक | १४. | आस्थापना अधिक्षक, |
| ३. | सहायक संचालक, नगर रचना | १५. | मिळकत व्यवस्थापक |
| ४. | सहा. आयुक्त(आरोग्य) | १६. | वाहन विभाग प्रमुख |
| ५. | शहर अभियंता | १७. | विधी विभाग प्रमुख |
| ६. | प्रभाग अधिकारी, समिती क्र. ०१ ते ०४ | १८. | म.बा.क./ दिव्यांग/ बालवाडी अधिक्षक |
| ७. | नगर सचिव | १९. | भांडारपाल |
| ८. | प्रकल्प अभियंता | २० | अभिलेखापाल |
| ९. | उप अभियंता(पा. पु.) | २१. | ग्रंथपाल |
| १०. | प्रमुख वैद्यकीय अधिकारी | २२. | टेलीफोन विभाग प्रमुख |
| ११. | जन्म मृत्यू निबंधक | २३. | क्रिडा विभाग प्रमुख |
| १२. | विद्युत अभियंता | २४. | कार्यकारी कर अधिक्षक (मार्केट वसुली विभाग) |

**प्रत माहितीस्तव सादर,**

१. मा. महापौर,
२. मा. उपमहापौर
३. मा. सभापती, स्थायी समिती
४. मा. सभापती, महिला व बाल कल्याण विभाग

**प्रत उचित कार्यवाहीस्तव**

१. अतिरिक्त आयुक्त
२. उपायुक्त(सा.प्र.)
३. उपायुक्त(महसूल)
४. उपायुक्त(सा.क.)

मा.प्र.
६३७
30/3/२६

30/3/२६

Scanned with OKEN Scanner

(१८५)

सौ. वैशाली अमित पाटील
नगरसेविका, महानगरपालिका जळगाव

ज.श.म.न.पा., जळगांव
सार्व.बांधकाम
आवक क्र. 903450
दिनांक: 7/3/26

दिनांक ०४/०३/२०२६

प्रति,
**मा.आयुक्त सो.**
**जळगाव शहर महानगरपालिका,**
**जळगांव.**

शहर महानगरपालिका,जळगांव
क्र 8068
दिनांक -4 MAR 2026
कार्यालय अधिक्षक उपायुक्त
आयुक्त

**विषय : जळगाव महानगरपालिकेत प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत घेण्यात आलेल्या निर्णय, मंजूर कामे, आर्थिक व्यवहार व प्रशासकीय कारभाराबाबत सविस्तर श्वेत पत्रिका (White Paper) प्रसिद्ध करण्याबाबत......**

**महोदय,**

जळगाव महानगरपालिकेमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्यानंतर लागू करण्यात आलेल्या प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत महानगरपालिकेचा संपूर्ण कारभार प्रशासकीय पातळीवर चालविण्यात आला. सदर कालावधीत विविध प्रशासकीय, आर्थिक, धोरणात्मक व विकासकामांशी संबंधित महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेले असल्याची माहिती उपलब्ध आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचा कारभार हा लोकशाही तत्त्वांवर आधारित असून जनतेच्या निधीचा उपयोग, त्यावरील निर्णयप्रक्रिया व अंमलबजावणी ही पूर्णपणे पारदर्शक, उत्तरदायी व नोंदवहीत अधोरेखित असणे अत्यावश्यक आहे.

सदर प्रशासकीय कालावधीत महानगरपालिकेचा एकूण मंजूर अर्थसंकल्प, प्रत्यक्ष झालेला खर्च, महसूल वसुलीची स्थिती, राज्य व केंद्र शासन अनुदानाचा वापर, कर्ज व्यवहार, तसेच प्रलंबित देयके यांचा सुस्पष्ट व लेखापरीक्षित तपशील जनतेसमोर येणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्या कालावधीत प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देण्यात आलेली विकासकामे, त्यांची अंदाजित किंमत, टेंडर प्रक्रिया, निविदा अटी, कंत्राटदार निवड, कामांची सद्यस्थिती व वेळवाढीची कारणे यांचा अधिकृत व सुसंगत आढावा उपलब्ध होणे गरजेचे आहे.

तसेच, सदर कालावधीत मालमत्ता विक्री, भाडेपट्टा, विकास आराखड्यातील बदल, करदर वाढ अथवा नवीन करनिर्धारण, सार्वजनिक-खाजगी भागीदारीतील निर्णय, मनुष्यबळ

प्राप्त 27/03/2026 Time-02.50

कार्यालय अधिक्षक

पुढील पान नंबर २...

निवास : ..., नारायण नगर, ... डॉ. राहुल पाटील यांच्या हॉस्पिटलजवळ, महाबळ, जळगाव - ४२५००१, ता. जि. जळगाव.

Scanned with OKEN Scanner

सौ. वैशाली अमित पाटील

नगरसेविका, महानगरपालिका जळगाव



भरती किंवा कंत्राटी नियुक्त्या, तसेच न्यायालयीन प्रकरणे व आर्थिक दायित्वे यासंबंधी घेतलेल्या निर्णयांचा वस्तुनिष्ठ व दस्तऐवजीकरण केलेला आढावा नागरिकांना समजणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या निधीचा वापर हा जनतेच्या कररूपी योगदानातून होत असल्यामुळे त्याचा संपूर्ण लेखाजोखा नागरिकांसमोर ठेवणे ही प्रशासनाची वैधानिक व नैतिक जबाबदारी आहे.

लोकशाही पद्धतीमध्ये निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या अनुपस्थितीत घेतलेले निर्णय, त्यामागील कारणमीमांसा व त्यांचे दीर्घकालीन परिणाम याबाबत स्पष्टता असणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून पुढील कालावधीत धोरणात्मक सातत्य राखता येईल यासाठी प्रशासकीय राजवटीच्या संपूर्ण कालावधीचा सविस्तर, तथ्याधारित व लेखापरीक्षणास अधीन असा अधिकृत श्वेतपत्रिका अहवाल तयार करून तो महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व सार्वजनिक माध्यमातून प्रसिद्ध करण्यात यावा, ही नम्र परंतु ठाम विनंती आहे.

सदर श्वेतपत्रिकेमध्ये आर्थिक, तांत्रिक, प्रशासकीय व कायदेशीर सर्व पैलूंचा समावेश करून पारदर्शकतेचे उच्चतम निकष पाळले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त करीत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सुदृढ प्रशासनासाठी व नागरिकांचा विश्वास दृढ करण्यासाठी ही बाब अत्यंत आवश्यक व समयोचित आहे.

आपण या मागणीचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

आपली विश्वासू

सौ. वैशाली अमित पाटील

**(वैशाली अमित पाटील)**

नगरसेविका,

जळगाव शहर महानगरपालिका प्रभाग क्र. १३

प्रतिलिपी : मा. जिल्हाधिकारी, जळगाव / संबंधित विभागीय अधिकारी / नोंद.



Scanned with OKEN Scanner